सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# विलासराव देशमुख शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, लातुर

## VILASRAO DESHMUKH GOVERNMENT MEDICAL COLLEGE, LATUR

मारवाडी राजस्थान शाळेजवळ, गांधी चौक, लातुर
Near Marwadi Rajasthan School, Gandhi Chowk, Latur.( Maharashtra ) 413512
Tel. No. © 02382-249292, (H) 02382-242199 Web Site- www.gmclatur.org
E. Mail – dean_gmchl@rediffmail.com
Gazzeted Section E. Mail –dean_gmchl @rediffmail.com

जा.क्र. विदेशावैमला/आस्था-राज/ 3953 /२०२३ दि. ६/०६/२०२३

### जाहिरात

सद्य:स्थितीत राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेचे आकस्मिक (सरप्राईज इन्स्पेक्शन) पदव्युत्तर विभागातील प्रस्तावित निरीक्षण होणार असल्यामुळे व रुग्णहित, शैक्षणिक कामकाजाच्या दृष्टीने लक्षात घेऊन तसेच मनुष्यबळाची कमतरता पडु नये म्हणुन या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर व विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय लातुर येथील सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे विनिमं पध्दतीने १२० दिवसाकरिता भरण्यासाठी खालील स्थानिक आरक्षणानुसार पात्र उमेदवारांनी अर्ज विहित वेळेत सादर करावेत. या करिता Walking Interview दि. १३.६.२०२३ रोजी ३.०० वाजता मुलाखत आयोजित करण्यात आलेली आहे.

| विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातुर | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विभाग | एकुण | अ.जा | अ.ज | विजा -अ | भज -ब | भज -क | भज -ड | विमाप्र | इमाप्र | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक | अराखीव |
| | | | १३% | ७% | ३% | २.५ % | ३.५ % | २% | २% | १९% | १०% | ३८% |
| १ | औषधवैद्यक शास्त्र | १ | १ | | | | | | | | | |
| २ | न्यायवैद्यकशास्त्र | १ | | १ | | | | | | | | |
| ३ | सुक्ष्मजीवशास्त्र | १ | | | | | | | | | | १* |
| ४ | श्वसनविकारशास्त्र | १ | | | | | | | | | १ | |
| ५ | मनोविकारशास्त्र | २ | १* | | | | | | | | | १ |
| ६ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | १ | | | | | | | | | | १ |
| ७ | कान नाक घसाशास्त्र | १ | | | | | | | | १ | | |
| | एकुण | ८ | | | | | | | | | | |
| विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुगणालय लातुर | | | | | | | | | | | | |
| ८ | हृदयरोगचिकित्साशास्त्र | १ | | | | | | | | | | १ |
| ९ | मज्जातंतू शल्यचिकित्साशास्त्र | १ | | | | | १ | | | | | |
| १० | नवजात अर्भक चिकित्साशास्त्र | १ | | | | | | | | | | १* |
| ११ | मुत्रपिंडविकारशास्त्र | १ | १ | | | | | | | | | |
| १२ | मुत्रपिंडशल्यचिकित्साशास्त्र | १ | | १ | | | | | | | | |
| १३ | जळीत व सुघटनशास्त्र | १ | | | | | | | | १ | | |
| १४ | क्ष-किरण शास्त्र | १ | | | | | | | | | १ | |
| | एकुण | ७ | | | | | | | | | | |

*** महिलासाठी राखीव**

**शैक्षणिक अहर्ता=-**

**सहाय्यक प्राध्यापक :-** राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार.

**वेतन :- सहाय्यक प्राध्यापक पदासाठी कंत्राटी निश्चित वेतन रु. १,००,०००/-.**

**वयोमर्यादा:-** मुलाखतीच्या दिवशी सहाय्यक प्राध्यापक पदाकरीता खुला प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**अर्ज विक्रीची /स्विकारण्याची तारीख व ठिकाण**

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ०१ | अर्ज विक्रीचा व स्विकारण्याचा दिनांक | ७.६.२०२३ ते ०९.०६.२०२३ (कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून) |
| ०२ | अर्ज स्विकारण्याची अंतीम दिनांक | ०९.०६.२०२३ (सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळून) |
| ०३ | प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक | १३.०६.२०२३ वार गुरुवार रोजी मा.अधिष्ठाता यांचे कार्यालय येथे दुपारी ३-०० वाजता. |

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे:-** अर्जासोबत खालील प्रमाणे साक्षंकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर कोणतेही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.
१) प्रथम द्वितीय,तृितीय वर्ष एमबीबीएस गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्र. (२) अतिविशोपचार विषयासाठी डी.एम./एम.सीएच, एमडी/एमएस/परीक्षा गुणपत्रीका/प्रमाणपत्र व प्रयत्न प्रमाणपत्र (३) एमबीबीएस/एमडी/एमएस/(अतिविशोपचार विषयासाठी डी.एम./एम.सीएच) एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र (४) अनुभव प्रमाणपत्र. (५) मगासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारासाठी जातीचे प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र/नॉनक्रिमीलीयर प्रमाणपत्र (३१.०३.२०२४ पर्यतचे) (६) जन्म तारखेकरीता एसएससी प्रमाणपत्र. (७) एचएससी प्रमाणपत्र. (८) एमएस-सीआयटी उत्तीर्ण प्रमाणपत्र (९) बंधपत्रीत उमेदवार म्हणून इतर संस्थेमध्ये काम न केले बाबतचे शपथ पत्र.

सहाय्यक प्राध्यापक तथा तत्सम पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती १२० दिवसाकरिता तात्पुरत्या स्वरुपात अस्थाई स्वरुपाची राहील व सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशनाने भरेपर्यंत किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यत किंवा मा.संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचे मार्फत बंधपत्र उमेदवारांची शिफारस होईपर्यंत यापैकी जे आधी घडले तो पर्यत करण्यात येईल.

नियम व अटी :-

१) अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. नियुक्तीनंतर उमेदवारास वैद्यकीय मंडळाचे वैद्यकीय प्रमाणपत्र ३ महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

२) सदरच्या जाहिरातीतील पदसंख्या बदलण्याबाबतचा अथवा सदरची जाहिरात पुर्णतः रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठातांनी राखुन ठेवला आहे.

३) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

४) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

५) अर्जदारांची नियुक्ती संचालनालयाकडुन बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपाची असुन जर शासनातर्फे निवड मंडळामार्फत /नामनिर्देशनाने / बदली अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कायम स्वरुपाच्या उमेदवारास रुजु करण्यात आल्यास अर्जदाराची त्या पदावरील सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.
उमेदवारांने रोखपाल, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या रु. ५००/- जमा करुन पावती दाखविल्यानंतर अर्ज संबंधीतास देण्यात येईल.

उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने आवश्यक कागदपत्रासह दु. ३.०० वाजता उपस्थित राहवे लागेल. मुलाखत ही दिनांक १३.०६.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता अधिष्ठाता कार्यालय, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांचे बैठक कक्षात होईल. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही. याची नोंद घ्यावी. मुलाखतीसाठी येणा-या उमेदवारांनी कोविड १९ प्रतिबंधात्मक सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ. समिर वि.जोशी)
अधिष्ठाता,
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, लातूर

प्रति,

१) सुचना फलक, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर.
२) सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय.
३) दैनिक एकमत, बार्शी रोड, लातूर

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर

१) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

Scanned with CamScanner